**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.**

गुरुवार, दि. १८.१२.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थाई समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. अनुजा अमितसिंह तेहरा, सभापती**

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| मोरे संजय गंगाधर | अन्नेवार गंगासागर संदिप |
| इंदूबाई शिवाजीराव घोगरे | प्रविण बालाप्रसाद बियाणी |
| संगिता पृथ्वीराज राओत्रे | ज्योती महेंद्र खेडकर |
| सलिमा बेगम नुरुल्ला खान | शर्मा पुष्पाताई राजेश |
| इशरत फातेमा अ. शमीम | कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम |
| कदम गंगाबाई नारायण | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| फारुख हुसेन कासीम साब | जकीया बेगम स. मुखतार |

**सभापती** स्थायी समिती सभापती पदी माझी निवड झाल्यानंतर आजची पहिली सभा माझ्या अध्यक्षतेखाली होत असून उपस्थित सर्व स.सदस्य, श्री सुशिल खोडवेकर आयुक्त, श्री प्रकाश येवले, उपआयुक्त, स. आयुक्त श्री विजयकुमार मुंडे, श्री आर.एस.कोलगणे मुख्य लेखा परिक्षक, श्री विसपुते लेखाधिकारी, डॉ.आसिफ प्र.मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री म.सादीक मुख्य लेखाधिकारी, श्री गिरीष कदम कार्यकारी अभियंता, श्री सुग्रीव अंधारे, कार्यकारी अभियंता बिएसयुपी व सर्व क्षेत्रिय अधिकारी व विभाग प्रमूख इतर सर्व कर्मचा-याचे स्वागत करुन मी आपणास आश्वासन देते की, शहर विकास कामाच्या संदर्भात माझे व स्थायी समितीच्या सर्व सदस्यांचे आपणास सहकार्य राहील तसेच आपणाकडूनही आम्हाला असेच सहकार्य मिळेल अशी मी आपणाकडून अपेक्षा व्यक्त करते व आजच्या सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात येते.

**विषय क्रं.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दीत **पिरबु-हाणनगर, नवा मोंढा, काबरा नगर, जयभिमनगर, इतवारा, सिडको, गाडीपुरा ई. भागात एकूण (२०) नग एनर्जी एफिशियंट २x२४ WT-५ पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे**. सदरील काम अत्यंत तातडीने करुन क्षवयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विधुत विभागाच्या) डिएसआर २०१४-१५ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर **श्री नॅशनल इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड** यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी **रुपये ६६,१२०/-** (अक्षरी रुपये सहासष्ठ हजार एकशे विस फक्त) एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसूची (ड) प्रकरण (५) कलम (२) अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव स्थायी समिती समोर सादर.

**उमेश चव्हाण** या प्रस्तावास मान्यता देण्यास आमचा विरोध नाही. सध्या मनपातर्फे मरक्युरी लाईट ,इतर साहित्य खरेदी करुन ते बसविणे,विद्युत लाईट देखभाव दुरुस्तीकरण्याचे कामासाठी कंत्राटदार नेमण्यात आलेला आहे.परंतू आम्ही प्रभागातील विद्यूत पोलवर मरक्युरी लाईट बसविण्याची मागणी करतो तेंव्हा मरक्युरी लाईट विद्यूत साहित्य उपलब्ध्द नसल्याचे सांगण्यात येते. कंत्राटदारास वारंवार सांगूनही ते काम करण्यास तयार नाही.कत्राटदार काम करण्यास तयार नसेल त्याचे विरुध्द गुन्हा दाखल करणार आहे काय ते काम करीत नसेल तर त्याचे देयक देण्यात येवू नये. सदस्यांनी मुलभूत नागरी सुविधाची किरकोळ कामे सांगितल्यानंतर ती कामे करावयास पाहिजे विविध कारणे देवून ते थांबविण्यात येवू नये.

**सभापती** स.सदस्यांनी त्याचे प्रभागात मरक्युरी लाईट बसविण्याची मागणी केली असेल तर ती त्यांची मागणी पुर्ण करण्यात यावी.

**संजय मोरे** मी मागील दोन वर्षापासून माझे प्रभागात २५ स्ट्रिट लाईट बसविण्यासाठी मागणी करीत आहे अनेक लेखी अर्ज दिले संबधित अभियत्यास अनेक वेळा भेटलो परंतू आज पर्यत स्ट्रिट लाईट बसविण्यात आलेले नाहीत.फाईल मंजुर झाली नाही असे सांगण्यात येत आहे. २५ लाईट बसविण्यासाठी किती खर्च येतो. इतर कामासाठी लाखो रुपये खर्च करण्यात येत आहे.

**उपअभियंता विद्युत** विद्युत लाईट उपलब्ध्द नसल्यामूळे बसविता आलेले नाही.विद्युत लाईट पुरवठा करणेसाठी कामाचे आदेश देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**उमेश चव्हाण** सर्व स.सदस्यांना लेखी पत्र देवून त्याचेकडून त्यांचे प्रभागात किती लाईट बसवावयाचे आहेत त्यांची मागणी घ्यावी

**आयुक्त** चार महिण्यापुर्वी विद्युत साहित्य विंधुत लाईट करण्यासाठी निविदा मंजुरीचा प्रस्ताव दिला होता त्यास स्थायी समितीने मान्यता दिली नाही, नव्याने महानगरपालिका हध्दीत समाविष्ट झालेला ग्रामीण भाग कौठा,वसरणी,असदवन,दोन्ही तरोडा या भागात मोठया लोकवस्ती वाढत असल्यामूळे लाईट बसविण्याची मागणी

जास्त असून अल्टरनेटपोल वर लाईट बसविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. विद्युत विभागातील कनिष्ट अभियंता यांनी सर्व प्रभागात स्थळ पाहणी करुन एकूण किती विद्युत बसवावे लागतील याचे नियोजन करुन प्राधान्याने विद्युत लाईट बसविण्याचे काम हाती घ्यावी..दोन तीन महिण्यात २००० लाईट बसविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. उर्जा स्रवंर्धन दिनानिमित्य कैंद्र शासनाच्या उर्जा विभागाकडून व महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) कडून कमी विज वापरुन जास्त प्रकाश देणारे विद्युत लाईट बसविण्या संदर्भात काही मार्गदर्शक सुचना आलेल्या असून त्या मार्गदर्शक सुचनेनुसार विद्युत लाईट बसविण्याचे नियोजन करण्यात येईल.

**फारुख हुसेन** बिएसयुपी विभागातून काही संचिका गायब झालेल्या आहेत.

**का.अभियता बिएसयुपी** संचिंका गहाळ झालेली नाही, संचिका शोधण्यात येईल.

**उमेश चव्हाण** बिएसयुपी योजने अंतर्गत ज्या घराचे बांधकाम करण्यात आले त्या घराच्या वरुन विद्युत तारा गेलेल्या आहेत काही घरात विद्युत पोल आलेले आहे. त्यामूळे हटविण्यात यावे.गोरक्षणनगर नारायणनगर भागातील रस्त्यावर विद्युत पोल आलेले आहेत तो हटविण्यात यावा. तसेच गोरक्षण भागातील एका नागरीकांच्या गॅलरी (पोर्च)मध्ये विद्युत पोल आलेला आहे तो ही हटविणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी लागू नये म्हणून त्यांनी गॅलरीचे ३.४ फुट बांधकाम केलेले आहे.बांधकाम परवानगी नियमातील तरतूदीनूसार गॅलरीचे बांधकाम करतो येते.

**आयुक्त** बिएसयुपी योजने अंतर्गत बांधकाम करण्यात आलेल्या बहुतांशी घरात आलेले विद्युत पोल हटविण्यात आले असून घरावरुन जात असलेल्या विद्युत तारा या हटविण्यात आलेल्या आहेत. काही तुरळक ठिकाणी असतील उपअभियंता विद्युत वि.यांनी पाहणी करुन विद्युत पोल, तारा हटविण्यासाठी कार्यवाही करावी.विद्युत मंडळाकडून खाजगी जागेवर विद्युत पोल उभारण्यात येत नाही. गोरक्षण भागातील नागीकाने मंजूर बांधकामापेक्षा अधिकचे बांधकाम केलेले आहे किंवा कसे याची स्थळ पाहणी करुन कार्यवाही करावी लागेल.संबंधित क्षेत्रिय अधिका-यांनी स्थळ पाहणी करुन नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

**सभापती** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१७७** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्यीत **पिरबु-हाणनगर, नवा मोंढा, काबरा नगर, जयभिमनगर, इतवारा, सिडको, गाडीपुरा ई. भागात एकूण (२०) नग एनर्जी एफिशियंट २x२४ WT-५ पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे**. सदरील काम अत्यंत तातडीने करुन क्षवयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विधुत विभागाच्या) डिएसआर २०१४-२०१५ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर **श्री नॅशनल इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड** यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी **रुपये** ६६,१२०/- (अक्षरी रुपये सहासष्ठ हजार एकशे विस फक्त) एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसूची (ड) प्रकरण (५) कलम (२) अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.२**

**श्री दुर्गा विसर्जणाच्या विविध घाटावर तात्पुरती प्रखर दिव्यांची व्यवस्था, जनरेटर टयुबपट्टी व्यवस्था अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने** निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विधुत विभागाच्या) डीएसआर २०१३-१४ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर **मे. सोनु इलेक्ट्रीकल्स नागपूर** यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी **रुपये १,५२,८९३/-** (अक्षरी रुपये एक लाख बावन्न हजार आठशे त्रेअन्नव फक्त एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ च्या अनुसूची (ड) प्रकरण (५) कलम (२) अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१७८** **ठराव**

**श्री दुर्गा विसर्जणाच्या विविध घाटावर तात्पुरती प्रखर दिव्यांची व्यवस्था, जनरेटर टयुबपट्टी व्यवस्था अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने** निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विधुत विभागाच्या) डीएसआर २०१३-१४ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर **मे. सोनु इलेक्ट्रीकल्स नागपूर** यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी **रुपये १,५२,८९३/-** (अक्षरी रुपये एक लाख बावन्न हजार आठशे त्रेअन्नव फक्त एवढा खर्च झालेला आहे.

करिता या कामास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ च्या अनुसूची (ड) प्रकरण (५) कलम (२) अन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.३**

**नांदेड शहर पाणी पुरवठा पंपिंग मशीनरी अंतर्गत दिनांक १०.०४.२०१५ ते १४.०९.२०१५ पर्यंत पाच पंप व्हॉल्व दुरुस्ती, स्थानिक बाजारातील रास्त दरा प्रमाणे खालील पंम्पाची दुरुस्ती करुन घेण्यात आली.**

१) काबरा नगर जलशुध्दीकरण केंद्र ३५ MLD व १७७ HP पंप

२) असदवन WTP ३५ MLD व १५० HP चा VT पंप

३) असदवन MBR चा ९०० MM Gear व्हॉल्व दुरुस्ती

४) कौठा ESR चा ४५० चा गिअर दुरुस्ती

५) सिडको Air blower दुरुस्तीची

सदरील काम तातडीने व गरजेची असल्याने **मे. हकीम इंजि. वर्कस नांदेड** यांच्याकडून करुन घेण्यात आले त्यास **रुपये ४,२२,०६०/-** खर्च झालेला आहे. यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे करिता प्रस्ताव मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

**सभापती** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १७९** **ठराव**

**नांदेड शहर पाणी पुरवठा पंपिंग मशीनरी अंतर्गत दिनांक १०.०४.२०१५ ते १४.०९.२०१५ पर्यंत पाच पंप व्हॉल्व दुरुस्ती, स्थानिक बाजारातील रास्त दरा प्रमाणे खालील पंम्पाची दुरुस्ती करुन घेण्यात आली.**

१) काबरा नगर जलशुध्दीकरण केंद्र ३५ MLD व १७७ HP पंप

२) असदवन WTP ३५ MLD व १५० HP चा VT पंप

३) असदवन MBR चा ९०० MM Gear व्हॉल्व दुरुस्ती

४) कौठा ESR चा ४५० चा गिअर दुरुस्ती

५) सिडको Air blower दुरुस्तीची

सदरील काम तातडीने व गरजेची असल्याने **मे. हकीम इंजि. वर्कस नांदेड** यांच्याकडून करुन घेण्यात आले त्यास **रुपये ४,२२,०६०/-** खर्च झालेला आहे. यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देणे करिता प्रस्ताव मुं.प्रा.मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.४**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत बीएसयुपी योजने अंतर्गत वेगवेगळया झोपडपट्टी भागात घरकुल व मुलभूत सुविधांची कामे फार मोठया प्रमाणात करण्यात आली आहेत.** कांही कामे पूर्ण झालेली असुन योजना अंतीम टप्यामध्ये असल्याने झालेल्या कामाचा माहितीपट तयार केल्यास महानगरपालिकेस व शासनास उपयुक्त ठरेल म्हणून ३ कमपन्याकडून दरपत्रक मागवुन सर्वात कमी दराचे **मे. पान्सवर्ड ठेलिव्हीजन (इंडीया) प्रा.लि. मुंबई यांचे रु. ९,२८,०००/-** या दराचे दरपत्रक स्थायी समितीने ठराव क्रं. २० दिनांक ११.०५.२०१५ अन्वये मंजुर केले आहे. त्यानुसार सदर कंपनीकडून माहितीपट तयार करुन महानगरपालिकेकडे सादर केला आहे परंतु सदर कामासाठी अतिरिक्त खर्च झाला आहे म्हणून मे. पानसवर्ड कंपनी, मुंबई यांना सर्व्हीस टॅक्सची व अतिरिक्त खर्चाची मागणी केली आहे.

मे. पान्सवर्ड कंपनीस सर्व्हीस टॅक्स देण्यात आले नसल्यामुळे त्यांनी रु. १,२९,९२०/- व सदरचा माहिती पट मराठी भाषेमध्ये डबींग केल्याने अगावून कामाचे रु. ८३,२२०/- अशी एकूण रक्कम रुपये २,१३,१४०/- ची मागणी केली आहे सदर रक्कम त्यांना अदाई करण्यासाठी अतिरिक्त खर्चास स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**सभापती** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १८०** **ठराव**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत बीएसयुपी योजने अंतर्गत वेगवेगळया झोपडपट्टी भागात घरकुल व मुलभूत सुविधांची कामे फार मोठया प्रमाणात करण्यात आली आहेत.** कांही कामे पूर्ण झालेली असुन योजना अंतीम टप्यामध्ये असल्याने झालेल्या कामाचा माहितीपट तयार केल्यास महानगरपालिकेस व शासनास उपयुक्त ठरेल म्हणून ३ कमपन्याकडून दरपत्रक मागवुन सर्वात कमी दराचे **मे. पान्सवर्ड ठेलिव्हीजन (इंडीया) प्रा.लि. मुंबई यांचे रु. ९,२८,०००/-** या दराचे दरपत्रक स्थायी समितीने ठराव क्रं. २० दिनांक ११.०५.२०१५ अन्वये मंजुर केले आहे. त्यानुसार सदर कंपनीकडून माहितीपट तयार करुन महानगरपालिकेकडे सादर केला आहे परंतु सदर कामासाठी अतिरिक्त खर्च झाला आहे म्हणून मे. पानसवर्ड कंपनी, मुंबई यांना सर्व्हीस टॅक्सची व अतिरिक्त खर्चाची मागणी केली आहे.

मे. पान्सवर्ड कंपनीस सर्व्हीस टॅक्स देण्यात आले नसल्यामुळे त्यांनी रु. १,२९,९२०/- व सदरचा माहिती पट मराठी भाषेमध्ये डबींग केल्याने अगावून कामाचे रु. ८३,२२०/- अशी एकूण रक्कम रुपये २,१३,१४०/- ची मागणी केली आहे सदर रक्कम त्यांना अदाई करण्यासाठी अतिरिक्त खर्चास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.५**

नावाशमनपाकेच्या **शिवाजीनगर येथील कस्तुरबा मातृसेवा केंद्र येथे शल्यचिकित्सक विभाग व प्रसुती विभाग पहिल्या मजल्यावर असल्याने रुग्णांना व गरोदर मातेची सिझर प्रसुतीसाठी त्यांना वरच्या मजल्यावर ने आण करण्यासाठी या ठिकाणी तातडीने नविन लिफ्ट बसविणे आवश्यक आहे** त्यामुळे लिफ्ट Manufacting कंपनी लिफ्ट पुरवठा करुन बसविणेसाठी कोटेशन दर मागविण्यात आले असता **मे. जे.के. क्वॉलिटेके प्रा. जि. लातुर** यांची सर्वात कमी दराची **रु. १२,२५,६८८/-** (अक्षरी रुपये बारा लाख पंचेवीस हजार सहाशे अठ्ठेअंशी फक्त) ची कोटेशन प्राप्त झाली आहे.

तरी या कामासाठी मे. जे.के. क्वॉलिटेक प्रा.लि. लातुर यांची रु. १२,२५,६८८/- ची कोटेशन मंजुरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

ठराव क्रं. १८१ ठराव

नावाशमनपाकेच्या **शिवाजीनगर येथील कस्तुरबा मातृसेवा केंद्र येथे शल्यचिकित्सक विभाग व प्रसुती विभाग पहिल्या मजल्यावर असल्याने रुग्णांना व गरोदर मातेची सिझर प्रसुतीसाठी त्यांना वरच्या मजल्यावर ने आण करण्यासाठी या ठिकाणी तातडीने नविन लिफ्ट बसविणे आवश्यक आहे** त्यामुळे लिफ्ट Manufacting कंपनी लिफ्ट पुरवठा करुन बसविणेसाठी कोटेशन दर मागविण्यात आले असता **मे. जे.के. क्वॉलिटेके प्रा. जि. लातुर** यांची सर्वात कमी दराची **रु. १२,२५,६८८/-** (अक्षरी रुपये बारा लाख पंचेवीस हजार सहाशे अठ्ठेअंशी फक्त) ची कोटेशन प्राप्त झाली आहे.

तरी या कामासाठी मे. जे.के. क्वॉलिटेक प्रा.लि. लातुर यांची रु. १२,२५,६८८/- ची कोटेशन मंजुर करण्या हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.६** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यी मध्ये जे व्यवसायीक दुकानांच्या माध्यमातून आपला व्यवसाय करतात त्यांना महानगरपालिके मार्फत व्यवसाय परवाना / नाहरकत प्रमाणपत्र दिल्या जाते.शहरामध्ये असे किती व्यावसायीक आहेत ज्यांनी महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना घेतलेला आहे आणि त्यामाध्यमातून महानगरपालिकेस वार्षिक किती उत्पन्न प्राप्त होते. तसेच जे व्यावसायीक मनपाकेचा परवाना न घेता दुकानांच्या माध्यमातून व्यवसाय करतात अशा व्यावसायीकांना ठराविक शुल्क आकारुन परवाना घेण्यास बाध्य करण्या करिता एक विशेष मोहिम राबविण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक:-** उमेशसिंह अशोकसिंह चाव्हाण **अनुमोदक :-** फारुख हुसेन कासीम साब

**आयुक्त** क्षेत्रिय कार्यालय ए च्या हध्दीत एकूण ५८३ व्यवसायीकांची संख्या असून त्यापैकी २८३ व्यवसायीकांनी परवाने काढलेले आहेत ३६० व्यवसायीकांनी परवाना काढलेला नाही. क्षेत्रिय कार्यालय बी च्या हध्दीत एकूण १५४३ व्यवसायीकांची संख्या असून त्यापैकी ८१९ व्यवसायीकांनी परवाने काढलेले आहेत. ७२३ व्यवसायीकांनी परवाना काढलेला नाही. क्षेत्रिय कार्यालय सी च्या हध्दीत एकूण ३५०४ व्यवसायीकांची संख्या असून त्यापैकी १७९४ व्यवसायीकांनी परवाने काढलेले आहेत , १७१० व्यवसायीकांनी परवाना काढलेला नाही. क्षेत्रिय कार्यालय डी च्या हध्दीत एकूण ६१२ व्यवसायीकांची संख्या असून त्यापैकी ३१५ व्यवसायीकांनी परवाने काढलेले आहेत, २९७ व्यवसायीकांनी परवाना काढलेला नाही.क्षेत्रिय कार्यालयातील अभिलेख्यानूसार शहरात एकूण ६२४२ नोंदणीकृत व्यवसायीक असून त्यापेकी ३०९० व्यवसायीकांनी व्यवसायाचा परवाना काढलेला आहे.३१५२ व्यापा-यानी व्यवसाय परवाना काढलेल्या नाही. व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र,परवाना पत्र देण्याचे अधिकार क्षेत्रिय अधिका-याना देण्यात आले आहेत सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी आपल्या क्षेत्रातील ज्या व्यवसायीकांनी परवाना काढलेला नाही त्यांना नियमानुसार नोटीसा देवून शुल्क वसुल करुन त्यांचा परवाना द्यावा जे परवाना काढणारनाहीत त्यांचे विरुध्द महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार कार्यवाही करावी.

**उमेश चव्हाण** आयुक्तांनी शहरात एकूण ६२४२ व्यवसायीक असून त्यापैकी फक्त ३०९० व्यापा-यानी व्यवसाय परवाना काढलेला असल्याची माहिती दिलेली आहे. माझे असे म्हणणे आहे की नांदेड शहरात पान टपरी चालविणारे, हातगाडयावर व्यवसाय करणारे,किरकोळ व्यापारी ,होलसेल व्यापारी असे लहान मोठे जवळपास ४० ते ४५ हजार व्यवसायीक आहेत . सर्व क्षेत्रिय अधिका-यानी आपल्या हध्दीतील सर्व व्यवसायीकाचा सर्व्हे करुन या सर्व व्यवसायीकांची व्यवसायानुसार व्यापा-यांची अ,ब,क,ड, अशी वर्गवारी करावी,वर्गवारीनुसार त्यांना पाच हजार ,तीन हजार, दोन हजार, एक हजार याप्रमाणे वार्षिक व्यवसाय परवानना शुल्क आकारणीचा प्रस्ताव तयार करुन तो मान्यतेसाठी स्थायी समिती/सर्वसाधारण सभेत ठेवावा, त्यावर निर्णय धेता येइल. सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब झालेली असल्यामूळे उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोंनातून या प्रस्तावावर निर्णय घेणे आवश्यक आहे.शासनाने जकात कर ,एलबीटी कर रध्द केलेला असल्यामूळे महानगरपालिका व्यापा-याकडून कोणत्याच प्रकारच कर /शुल्क घेत नाही त्यामूळे शहरातील सर्व व्यवसायीकांना व्यवसाय परवाना शुल्क बंधनकारक करण्यात यावे जेणे करुन यापासून महानगरपालिकेस १५ ते २० कोटीचे उत्पन्न दरवर्षी मिळू शकेल.तसेच महानगरपालिका अधिनियमातील कलम १२७ नुसार परवाना देण्याचे अधिकार आहेत , शहरात जवळपास २०-२५ हजार ऍटोरिक्षा चालतात त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येत नाही. यापुर्वी नगरपालिका अस्तित्वात असतांना शहरातील सर्व साईकल रिक्षाधारकांना प्रतिमहा पाच रु. शुल्क आकारुन बिल्ले देण्यात येत होते. त्या प्रमाणे आरटिओकडून माहिती घेवून शहरातील सर्व ऍटोधारकांनाही वर्षाला रु. २०० शुल्क आकारण्यात यावे व त्यांना महानगरपालिका हदीत रिक्षा चालविण्याचा परवाना देण्यात यावा यामूळेही महानगरपालिकेचे उत्पन्न वाढू शकते. या प्रस्तावावर आयुक्त साहेबांनी विचार करावा.

**आयुक्त** ऍटोरिक्षाना परवाना देण्याचे अधिकार महानगरपालिकेस आहेत किंवा नाही याबाबत कायदेशिर बाबी तपासून कार्यवाही करण्यात येईल. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनातून श्री उमेश चव्हाण यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे तो अत्यंत चांगला प्रस्ताव आहे. सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी आपल्या हध्दीत सर्व्हे करुन सर्व प्रकारच्या व्यवसायीकाची वर्गवारी नूसार यादी तयार करुन सभापती महोदयाना व माझ्याकडे सादर करावी.

महानगरपालिकेस स्थानिक संस्था करापासून जवळपास ७० ते ७५ कोटीचे उत्पन्न मिळाले असते परंतु शासनाने स्थानिक संस्था कर बंद केल्यामूळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात घट झालेली आहे. १०-१५ वर्षापासून शहरातील ब-याचश्या नागरीकांकडे मालमत्ता कराची व पाणी पटी कराची थकबाकी असून विशेष मोहिम राबवून ती वसुल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**सभापती** शासनाने स्थानिक संस्था कर बंद केल्यामूळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब झालेली असून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी आपणा सर्वाना प्रयत्न करावे लागणार आहे. श्री उमेश चव्हाण यांनी उत्पन्न वाढीच्या दृष्टीकोनाते जो प्रस्ताव दिला अत्यंत चांगला आहे. सर्व क्षेत्रिय अधिका-यानी आपल्या भागाचा सर्व्हे करुन सर्व व्यापा-यांना व्यवसाय परवाना काढण्यासाठी बधनकारक करावे, ज्याचे परवाना मुदत संपलेली आहे त्यांचेही परवाना नुतनीकरण करुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करण्यात यावा.निश्चित करण्यात आलेले परवाना शुल्क कालबाहय झालेले असल्यामूळे ते वाढविण्याचे संदर्भात आयुक्तांनी प्रस्ताव द्यावा. स्थानिक संस्था कराच्या बाबतीत खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** राज्य शासनाने जकात कर बंद करुन दि.१.४.२०१० पासून स्थानिक संस्था आकारण्याचा निर्णय घेतला व नंतर दि.३१.७.२०१५ नंतर स्थानिक संस्था करही रध्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे. स्थानिक संस्था कराच्या सालसन २०१०-२०११ पासून ते आज पर्यत शहरातील जवळपास ६६०० व्यापा-यानी अधिकृतरित्या नोंदणी केलेली असून स्थानिक संस्था कराच्या कालावधीत ज्या व्यापा-यांनी स्वत:हून स्थानिक संस्था कर भरलेला नाही त्यांना कोणत्याही प्रकारची व्याज व दंड न आकारता त्यांचेकडून नियमानुसार लागत असलेला स्थानिक संस्था कर भरण्यासाठी शासनाने अभय योजना लागू केलेली असून अंदाजे १५०० व्यापा-यानी अभय योजने अंतर्गत ५६३३ संचिकेत अर्ज सादर केलेले आहेत या प्राप्त अर्जाचे दि.३१ मार्च २०१६ पुर्वी कर निर्धारण करणेचे काम प्रगतीपथावर आहे. अभय योजना २०१५ अंतर्गत लाभ न घेतलेल्या एकूण संचिका १७०७४ असून ३१ मार्च २०१६ नंतर अभय योजना लाभ न घेतलेल्या व्यापा-यांना नियमानुसार नोटीसा देवून त्यांचेकडून नियमानूसार एलबीटी करासह व्याज व व दंड वसुल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**उमेश चव्हाण** अभय योजने अंतर्गत लाभ् न धेतलेल्या संचिका १७०७४ आहेत यातील सर्व व्यापारी ३१ मार्च २०१६ नंतर एलबीटी कर, व्याज व दंड भरतील काय

**आयुक्त** अभय योजने अंतर्गत लाभ् न धेतलेल्या संचिका १७०७४ सचिंकेतील संबंधित व्यापा-यांनी एलबीटी कर, व्याज व दंड नाही भरला तर नियमानुसार त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात येईल.

**सभापती** श्री उमेश चव्हाण यांनी मांडलेला प्रस्ताव मंजुर करण्यात येतो .व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १८२** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हध्दीतील मध्ये चार क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत व्यापा-यांची एकूण ६२४२ संख्या आहेत त्यापैकी एकूण ३२११ व्यापा-यानी व्यवसाय प्रमाणपत्र काढले व यापासून महानगरपालिकेस रु.९२६२५८/-चे उत्पन्न मिळाले व ३०९० व्यापा-यानी व्यवसाय परवाने काढलेले नसल्यामूळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे . करीता सर्व क्षेत्रिय अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील ज्या व्यापा-यांनी व्यवसाय परवाना काढलेला नाही त्यांना नियमाप्रमाणे नोटीसा देण्यात याव्यात. जे व्यवसायीक नोटीसा देवूनही परवाना शुल्क भरुन व्यवसाय परवाना काढणार नाही त्याचे विरुध्द महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार कार्यवाही करावी. तसेच बिल कलेक्टर मार्फत आपल्या कार्यक्षेत्रातील पान टपरी दुकाना पासून ते होलसेल व्यापा-च्या दुकानाचा पुनश्च सर्व्हे करुन व्यवसाय निहाय मोठे व्यपारी , मध्यम व्यापारी व किरकोळ व्यापारी, पान टपरी चालविणारे दुकानदार अशा दुकानाचे वर्गीकरण करुन त्याची यादी सभापती,स्थायी समिती व आयुक्त नांवामनपा नांदेड यांचेकडे सादर करावी. महानगरपालिकेने यापुर्वी निश्चित करण्यात आलेले परवाना शुल्काचे दर हे कालबाहय झालेले असल्यामूळे परवाना शुल्कात वाढ करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभा/स्थायी समिती यांच्याकडे सादर करावा. असे ही नांवामनपा स्थायी समिती सभा सर्वानुमते संमत करते.

तसेच शहरात मोठया प्रमाणात रिक्षा चालतात त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येत नाही. करीता रिक्षा चालकांनाही नियमाप्रमाणे रिक्षा परवाना शुल्क वसुल करता येतो काय याबाबत कायदेशिर बाबी तपासून व इतर महानगरपालिकेकडून माहिती धेवून त्यांनाही शुल्क आकारुन रिक्षा परवाना देणेचा प्रस्ताव देण्यात यावे असे ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते संमत करते. व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. ७** **प्रस्ताव**

नांदेड शहराला ज्या विष्णुपूरी प्रकल्पातुन पाणी पुरवठा होतो तेथील जलसाठयाची सद्यस्थिती काय आहे ? तसेच आहे तो जलसाठा शहराला किती दिवस पुरणार आहे याची सविस्तर माहिती देणे तसेच शहरा करिता पर्यायी जलस्त्रोताची कांही व्यवस्था करण्यात आली आहे काय या बाबत सविस्तर चर्चा करणे बाबतचा प्रस्ताव सभागृहासमोर सादर

**सुचक :-** संजय मोरे **अनुमोदक :-** इशरत फातेमा अ. शमीम

**आयुक्त** मागील वर्षी पावसाचे प्रमाण जास्त असल्यामूळे शंकर विष्णुपरी जलाशय १०० टक्के भरले होते व ऑक्टोबर १४ पर्यत गोदावरी नदीत पाण्याची आवक होती परंतु यावर्षी पावसाचे प्रमाण कमी असल्यामूळे दि.२६.९.२०१५ पर्यत फक्त ७० टक्के भरले पात्रात पाण्याची आवक ही नव्हती.त्यामूळे पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता

असल्यामूळे शहरात दि.२.९.२०१५ पासून दोन दिवसाआड वरुन तीन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला. आजच्या तारखेस जलाशयात २९.०८ द.ल.घ.मी.पाण्याचा साठा शिल्लक आहे.त्यातून प्रतिदिन ३५ द.ल.घ.मि.पाणी उपसा करीत आहोत. पाण्याचा साठा व पाणी उचलण्याचे प्रमाण पाहता विष्णुपरी धरणातील पाण्याचा साठा एपिल पर्यत पुरेल एवढा शिल्लक आहे. त्यामूळे उर्ध्व प्रकल्पातून २० द.ल.घ.मि.कायम स्वरुपी आरक्षित करण्याची मागणी शासनाचे संबंधित विभागास केलेली असून त्यातून पहिल्या आर्वतनात पर्यायी उदभव पाणी पुरवठा योजनेव्दारे उर्ध्व प्रकल्पातून कालव्याव्दारे पाणी घेण्यात आलेले असून ते आसना नदीत बांधण्यात आलेल्या सांगवी व पिंपळगाव येथील बंधा-यात साठविण्यात आले आणि ते पाणी १४ जानेवारी पासून आपण उचलीत आहोत.एका आवर्तनात हे दोन्ही बंधारे पुर्णपणे भरले तर आपणास २० दिवस पुरते. शंकर विष्णुपुरी जलाशतील पाणी शेतकरी अनाधिकृतपणे उपसा करु नये म्हणून प्रकल्पापासून १९ कि.मि. पर्यतचे असलेले १३७ विद्युत ट्रान्सफार्मर बंद करणेसाठी एमएसईबीला कळविण्यात आलेले आहे.तरी पण शेतकरी रात्री बेरात्री शेतीकरीता चोरुन पाणी उपसा करीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.अनाधिकृत पाणी उपसा रोकण्यासाठी बोटीने १९ कि.मी.परिसरात रात्री बे रात्री फिरावे लागते,त्यामूळे जिल्हाधिकारी नांदेड यांचेमार्फत जलाशयातील पाण्याची चोरी न होवू देण्यासाठी विशेष पथकाची नेमणुक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. एप्रिल मध्ये आपणास तीन दिवसा आड ऐवजी चार दिवसा आड पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घ्यावा लागेल.

**संजय मोरे**

आयुक्तांनी साहेबांनी मागील वर्षी १०० टक्के धरण भरले होते व या वर्षी ७० टक्के धरण भरले असल्याचे व धरणात आज फक्त २९.०८ द.ल.ध.मि. पाणी शिल्लक असल्याची माहिती दिलेली आहे. या उपलब्ध्द पाण्याच्या साठयातून दररोज ३५ द.ल.घ.मि.पाणी उचलण्यात येत असेल तर हा पाण्याचा साठा फक्त मार्च पर्यत पुरेल एवढाचा आहे. नंतर पाण्याची काय परिस्थिती राहिल.ऐन उन्हाळयात पाणी कुठून मिळणार पाण्याचे कसे नियोजन राहील. आता पासूनच आपणास खाजगी विहिरीचे अधिग्रहाणाची कार्यवाही करावी लागेल. ना दुरुस्त असलेले हातपम्प दुरुस्त करुन त्यावर सबमर्सिबल पंम्प बसवावे लागेल.मोठया प्रमाणात लिकेजेस असल्यामूळे तसेच व्हाल्व्ह ना दुरुस्त असल्यामूळे दररोज हजारो लिटर पाणी वाया जात आहे ते दुरुस्त करणे आवश्यक आहे. वॉलमनच्या निष्काळजीपणा मूळेही पाणी पुरवठा जास्त वेळ राहून पाणी वाया जात आहे .याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे अशा आमच्या सुचना आहे.

**आयुक्त**

प्रशासना मार्फत संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेवून त्यावर उपाय योजना करण्यात येत आहे. नांदेड शहरात जेएनएनयुआरएम योजनेतील सुधारीत पाणी पुरवठा योजने अंतर्गत नविन पाईप लाईनी टाकण्यात आलेल्या आहे. मुख्य जलवाहिणीला नविन योजनेतील पाईप लाईन जोडण्यात आल्यानंतर जून्या योजनेतील पाईप लाईनचे कनेक्शन कट करावयास पाहिजे होते परंतु तसे न केल्यामूळे दोन्ही पाईप लाईन मधून पाणी पुरवठा होत असल्यामूळे पाणी जास्त वेळ राहून पाणी वाया जात आहे त्यामूळे असे स्पॉट शोधून जून्या पाईप लाईनचे कनेक्शन कट करण्याची कार्यवाही सबंधित अभियंत्यांनी करावी.शहरातील सर्व विंधनविहिरीचे हातपम्पाची दुरुस्ती करण्यासाठी विशेष पथक स्थापन करण्यात आलेले असून त्याचे मार्फत विशेष मोहिम राबवून हातपंम्पाची दुरुस्ती करण्यात येत आहे. शहरात एकूण १०५७ विंधन विहिरी त्यापैकी ७९३ विहिरीवर हातपंप व २६४ विद्युत पप बसविण्यात आलेलेले आहे ते सतत कार्यरत राहतील याची दक्षता घेण्यात येत आहे.पाणी पुरवठा विभागाने प्रत्येक पाण्याच्या टाकीवर पाणी सोडण्याकरीता नेमलेल्या वॉलमनना पाणी सोडण्याचा कालावधी निश्चित करुन देण्यासाठी आदेशित करण्यात येत आहे.

**संजय मोरे**

वसरणी हे गांव उंच टेकडीवर वसलेले असल्यामूळे या गावातील नागरीकांना पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नाही त्यामूळे वसरणीमध्ये तत्कालिन ग्रामपंचायतीची पाणी पुरवठा योजना अस्तित्वात होती त्या योजनेतील काही ठिकाणी पिव्हिसी पाईप लाईन खराब झाल्यामूळे ते बदलण्यात यावे व ही योजना कार्यान्वीत करावी अशी मागणी मी ब-याच दिवसापासून करीत आहे परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. माझी विनंती आहे की, ही ग्रामपंचायतीची योजना कार्यान्वीत करावी जेणे करुन त्या भागातील नागरीकांना पाणी टंचाई काळात पाणी पुरवठा होवू शकेल.

**आयुक्त**

ठराविक वसरणी भागासाठी दोन दोन पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत ठेवणे हे महानगरपालिकेस आर्थिक दृष्टया परवडणारे नाही. ग्राम पंचायतीची पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करावयाची असेल तर महानगरपालिकेची पाणी पुरवठा व्यवस्था बंद करावी लागेल. वसरणी भागातील नागरीकांनी लोकवर्गणी करुन लोकवर्गणीतून जुनी पाणी पुरवठा कार्यान्वीत करावी यास प्रशासनाचा विरोध नाही. शासनाने तातडीची उन्हाळी पाणी पुरवठा योजने अंतर्गत निधी उपलब्ध्द करुन दिला तर जून्या योजनेतील खराब झालेली पिव्हिसी पाईप लाईन बदलण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**उमेश चव्हाण**

सभापती सौ.अनुजा तेहरा यांनी शंकर विष्णुपुरी जलाशयातील गाळ काढण्यासाठीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभे समोर ठेवला होता सर्वसाधारण सभेने त्यास मान्यता दिलेली आहे प्रकल्पातील गाळ काढण्यात यावा.

**आयुक्त** सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार शासनास शंकर विष्णुपुरी जलाशयातील गाळ काढयाची विनंती केलेली आहे.शंकर विष्णुपुरी जलाशयाची मालकी ही शासनाच्या पाटबंधारे विभागाची असून त्यावर जिल्हाधिकारी यांचे नियंत्रण आहे. एप्रिल मध्ये पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर प्रकल्पाजवळील गाळ काढता येईल व पम्पींग स्टेशनकरीताही जमिन अधिगृहीत करता येईल.जिल्हाधिकारी नांदेड यांना महानगरपालिकेतील पदाधिका-याचे एक शिष्टमंडळ भेटून शासनाच्या जलयुक्त शिवाय योजनेतुन जलाशयातील गाळ काढण्यासाठी विनंती करण्यात यावी.

**उमेश चव्हाण** शहरातील ले आवूट मधील मोकळया जागेत उद्यान विकसित करण्यासाठी सार्वज्निक वापराकरीता ११ महिण्याच्या लिजवर विविध संस्थाना नागरीकांना भाडेपटीवर देण्यात आलेल्या आहेत परंतु असे निदर्शनास आले आहे की. सदरील मोकळया जागेचा वापर हा उद्यान किंवा इतर सार्वजनिक कामासाठी न होता जागेची स्वतः मालकी समजून त्याचा स्वतः कामाकरीता पार्कींग करीता गैरवापर करीत आहे.११ महिण्याची लिज संपुणही जागा ताब्यात धेण्यात आलेल नाही किंवा मुदतवाढ देण्यात आलेली नाही. शहरातील ले आवूट मधील मोकळया जागा कोणा कोणास दिलेल्या आहेत त्याची यादी आम्हाला देण्यात यावी.

**आयुक्त** मालमत्ता व्यवस्थापकाने ले आवूट मधील मोकळया जागा कोणा कोणास भाडेपटीवर दिलेल्या आहेत त्याची सविस्तर माहिती सभागृहात देण्यात यावी. सुप्रिम कोर्टाने,व शासनाने जानेवारी २००९ नंतर शासनाच्या व महानगरपालिकेच्या जागेवर धार्मीक कारणाकरीता अतिक्रमन करुन त्यावर मंदिर, मस्जीद, चर्च आदीचे बांधकाम केलेले असेल किंवा सार्वजनिक जागेवर धर्माचे झेंडे लावलेले असतील तर ते त्वरीत काढून टाकण्याचे निर्देष दिलेले आहे.त्यानुसार क्षेत्रिय अधिकारी श्री अविनाश अटकोरे, श्री सुधार इगोले,श्री जगदिश कुलकर्णी, श्री जी,पी.देशमूख हे चांगले काम करीत आहेत.

**गंगासागर अन्नेवार** माझ्या प्रभागात मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकामे होत आहेत.नगरोत्था योजनेची कामेही अर्धवट आहेत ती पुर्ण करण्यात यावी.

**आयुक्त** मोघम स्वरुपाची तक्रार करण्यात येवू नये ,अनाधिकृत बांधकाम करणा-याचे स्थळानिशि नांव देण्यात यावे निश्चित त्याचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी. सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी आपल्या परिसरात होत असलेल्या अनाधिकृत बांधकामा विरुध्द व मंजुर नकाशा विरुध्द कार्यवाही करावी. झालेली अनाधिकृत बांधकाम गुठेवारी व हार्डशिप प्रिमियम योजने अंतर्गत शुल्क आकारुन नियमानूसार ती नियमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.नगरोत्थान योजने अंतर्गत् शासनाचा ५० टक्के सहभाग व महानगरपालिकेचा ५० टक्के सहभाग भरुन या योजनेतील कामे करावयाची आहेत. शासनाने आपला सहभाग म्हणून ७७ कोटीचा निधी दिलेला आहे परंतु आर्थिक परिस्थिती खराब असल्यामूळे महानगरपालिकेस आपला सहभाग नोंदविता आलेला नसल्यामूळे कामे अर्धवट आहेत, ही अर्धवट कामे पुर्ण करण्यासाठी शासनास निधी देण्याची विनंती करण्यात आलेली आहे. टप्या टप्याने अर्धवट कामे करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**सभापती** आयुक्त नांवामनपा यांनी प्रस्तावाच्या अनुषंगाने माहिती दिली त्याची नोंद घेण्यात येते.पाणी टंचाईसाठी करावयाचे उपाय योजना करण्यासाठीचे जे काही प्रस्ताव प्रशासनामार्फत येतील त्यास स्थायी समिती प्राधान्याने मान्यता देईल

**ठराव क्रं. १८३** **ठराव**

नांदेड शहराला ज्या विष्णुपूरी प्रकल्पातुन पाणी पुरवठा होतो तेथील जलसाठयाची सद्यस्थिती काय आहे , तसेच आहे तो जलसाठा शहराला किती दिवस पुरणार आहे व शहरा करिता पर्यायी जलस्त्रोताची जी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे याची सविस्तर माहिती आयुक्तांनी दिली त्यांची नोंद ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते.

**सभापती** स.सदस्यांनी प्रभागातील कामाचे संदर्भात सबंधित अधिका-यांना मोबाईल लावला तर सबधित अधिकारी मोबाइल उचलित नाही अशी तक्रार आहे.

**आयुक्त** या संदर्भात मी सर्वसाधारण सभेत खुलासा केलेला आहे. कोणताही अधिकारी कोणत्याही वेळी आलेला प्रत्येक मोबाईल उचलू शकत नाही. अधिका-यांना सुचना आहे की आपण जेव्हा कामात असाल किंवा काही कारणामूळे मोबाईल उचलता येत नाही हे ठिक आहे परंतु आपण जेव्हा फ्रि होताल त्यावेळी आपणास कोणकोणत्या स.सदस्याचे मोबाइलवर मिसकॉल आले ते तपासून त्यांना मोबाइल लावून त्यांचेशी बोलावे.

**सभापती** सर्व क्षैत्रिय कार्यालयाना संबंधित प्रभागाच्या नगरसेवकांना मी स्वतः भेट देणार आहे. त्यावेळी सर्व क्षेत्रिय अधिका-यानी कार्यालयीन कामकाजाची माहिती द्यावी.

**आयुक्त** सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी यांची नोंद घेवून स.सभापतीना कार्यालयीन कामकाजाची माहिती द्यावी.शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) हे एक अभियान म्हणुन राबविण्यास शासन निर्णय, नगरविकास विभाग, क्रं. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२३/नवि-३४, दिनांक १५ मे २०१५ अन्वये मान्यता देऊन शासनाने, शासन परिपत्रक क्रं. राअसं/कार्यान्वयन सुचना/४२/१५१६, दिनांक २८ जुलै २०१५ अन्वये, राज्यातील शहरामधील उघडयावर शौच करण्याचे प्रथा बंद करुन शहर हे हंगदारी मुक्त करण्या

संदर्भात कार्यान्वयन सुचना दिल्या आहेत. या अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या अमलबजावणीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करुन, अमलबजावणी कक्षामार्फत सर्वेक्षण, माहीतीचे संकलन, कृती आराखडया तयार करणे. जनजागृती, अर्ज मागविणे, स्थळ निरीक्षण, अर्ज मंजुरी, शौचालय बांधकामाचे नमुने, पर्यवेक्षण पुर्णत्व अहवाल, संकेत स्थळावर माहिती भरणे, व प्रगती अहवाल पाठविणे इत्यादी कार्यवाहीचे टप्पे नमुद केले आहेत. सदर शासन परिपत्रकानुसार, महानगरपालिका नांदेडने महापालिका क्षेत्रातील सर्वेक्षणाचे काम दिनांक ०८.०८.२०१५ रोजी हाती घेवुन, त्या अंतर्गत एकूण ४२०४ लाभार्थ्यांचे विहीत जोडपत्राअन्वये माहितीचे संकलन करण्यात आले या नंतर क्षेत्रीय कार्यालय निहाय वसुली लिपीक यांच्या मार्फत जोडपत्र-२ तसेच तांत्रीक कर्मचारी यांचे मार्फत स्थळ निरीक्षण करण्यात येऊन पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात आली आहे. शासनाने वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्याचा निधीचा पहीला हप्ता रुपये २६६.१३ लक्ष महापालिकेस वितरीत केला असुन सन २०११ च्या जनगणने नुसार शौचालयाचे सुविधा उपलब्ध नसल्याने उघडयावर शौचास जाणा-या कुटूंबाची संख्या १२,०७३ आहे. यानुसार पहिला टप्यात २१९५ वैयक्तीक शौचालय बांधकामाचे उदिष्ट आहे.

राज्य स्तरावर वर्षनिहाय असलेल्या वैयक्तीक शौचालयाचा अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने तातडीचे धोरण ठरवीने गरजेचे असल्यामुळे केंद्र शासनाच्या शहरी विकास मंत्रालय संयुक्त सचीव एंव मिशन निदेशक (S.B.M) मा. श्री प्रवीण प्रकाश यांनी अर्ध शासकीय पत्र क्रं. १२/४०/२०१५ S.B.M दिनांक १७ नोव्हेंबर २०१५ अन्वये नोंदणीकृत व पात्र कंत्राटदारांना एकदाच रु. ३०.०० लक्ष पर्यंत १५० वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम सम समान व रास्त पध्दतीने वाटप करुन जलद गतीने काम पुर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. महापालिका क्षेत्रातील एकूण (२४७५) पात्र वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम व यापुढील पात्र होणा-या वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम या आर्थीक वर्षात पुर्ण करावयाचे असल्यामुळे, सदरील कामे अल्प मुदतीत करावयाचे असल्याने व कामाची तातडी लक्षात घेता कामे निविदा प्रक्रिया हाती घेवुन करण्यासाठी होणारा विलंब लक्षात घेता वरील अर्धशासकीय पत्राच्या संदर्भानुसार नोंदणीकृत कंत्राटदार यांना काम सम समान पध्दतीने वाटप करुन, अंदाजपत्रक दरावर म्हणजे रु १७,०००/- प्रति शौचालय या दराने विना निविदा काम हाती घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे इतर महानगरपालिकेने शासन निर्देशानूसार कामे सुरु केलेली आहे. आपणास ३१ मार्च २०१६ अखेर शौचालयाचे बाधकाम करण्याचे उदिष्ट देण्यात आलेले आहे. प्रशासनाची विनंती आहे की, या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. जेणे करुन मार्च २०१६ अखेर देण्यात आलेले शौचालयाचे बाधकामाचे उदिष्ट पुर्ण करता येईल.

**सभापती** स्थायी समितीच्या संदस्यांची अनौपचारीक बैठकीत आयत्या वेळेसचे प्रस्तावावर निर्णय घेण्यात येवू नये प्रत्येक विषय विषय पत्रिकेवर घेण्यात यावा असा निर्णय घेण्यात आलेला आहे त्यामूळे आयुक्तांचा प्रस्ताव विषय पत्रिकेवर घेवून दि.२३.१२.२०१६ रोजी आयोजित करण्यात येणा-या स्थायी समितीचे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात येईल. आजच्या स्थायी समितीची सभा शांततेत व खेळामेळीच्या वातावरणात पार पाडण्यास सर्व स्थायी समितीच्या सदस्यांनी अधिका-यानी सहकार्य केले त्याबदल मी सर्वाना धन्यवाद देते व आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.